# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर

Office : 02382-250634
Fax :- 02382-251866
E-mail:- cglatur@mahadiscom.in

महावितरण

Office of the Exe. Engr. CGRF
Latur Zone. Vidyut Bhavan, Ground floor. Old power house. Sale galli.
Latur – 413512

EE/CGRF/LTR/ 69

Date :- 02.08.2018

ग्राहक तक्रार क्र. : ०७/२०१८
तक्रार दाखल दिनांक : ०६.०३.२०१८

प्रति,

१. श्री. बब्रुवान रुपसिंग पवार
अनुसयाबाई बब्रुवान पवार
रा. माळेवाडी ता.उदगीर
जि. लातूर ४१३५१७

२. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
उप-कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित. शहर उपविभाग, उदगीर ४१३५१७

विषय :- तक्रार अर्ज क्र. ०७/२०१८ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन श्री. बब्रुवान रुपसिंग पवार यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत आपल्या माहितीस्तव सोबत जोडली आहे.

३/८/१८

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

सोबत : वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**

१ मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**

१. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, मंडल कार्यालय, लातूर
२ कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, मंडल कार्यालय, लातूर
३. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, विभागीय कार्यालय, उदगीर



Scanned by CamScanner

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय.लातूर

ग्राहक तक्रार क्रमांक : ०७/२०१८
ग्राहक तक्रार दाखल दिनांक : ०६.०३.२०१८

श्री. बब्रुवान रुपसिंग पवार
अनुसयाबाई बब्रुवान पवार
रा.माळेवाडी, ता.उदगीर जि.लातूर -- ग्राहक अर्जदार

-- विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप-कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, शहर उपविभाग, उदगीर -- गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम : | श्री.माणिक व्ही.येवतीकर | अध्यक्ष |
| | श्री. एस. आर. कुलकर्णी | सचिव |
| | श्री.सुधीर भाऊराव देशमुख | सदस्य |

### निकाल

दि. ०२.०८.२०१८

ग्राहक अर्जदार, श्री. बब्रुवान रुपसिंग पवार (मयत), माळेवाडी, उदगीर, ग्राहक क्र. ६२२१३०००१४७६ यांच्या तर्फे प्रस्तुत तक्रार अ फॉर्ममध्ये दि. ०६.०३.२०१८ रोजी त्यांच्या पत्नी व ग्राहक अनुसया बब्रुवान पवार यांनी मंचामध्ये दाखल केली आहे.

ग्राहक प्रतिनिधीचे गाऱ्हाणे/तक्रार खालील प्रमाणे आहे.

त्यांचे कनेक्शन सन २००१ ते २००२ पासुन चालू आहे. त्या कर्नाटक राज्यातील डोंगर तांडा येथील लमानी जातीच्या विधवा आहेत. त्यांच्या पतीचे २०१२ मध्ये अपघात निधन झाल्यामुळे व त्यांच्या पतीची डोंगरगाव येथे जमीन असल्यामुळे त्या अधुनमधून डोंगरगावला जातात. त्यामुळे त्यांचा विजेचा वापर कमी प्रमाणात आहे. त्यांना अचानक मे २०१४ या महिन्यामध्ये २५५३ युनीटचे बिल आलेले आहेत त्यांच्या मते त्यांचे बिल रिडिंग न घेता चुकीचे व अंदाजे देण्यात आले आहे. बिलावर RNT असा शेरा आहे. त्यांना १२.१०.२०१७ रोजी रु.६७३९१/- येवढ्या रकमेची Disconnection Notice गेली आहे. त्यामुळे त्यांचे रु. ६८८८०/- येवढ्या रकमेचे बिल रिडिंग प्रमाणे दुरुस्त करावे व त्यावर दंड व व्याज आकारणी करु नये. विद्युत पुरवठा बंद करु नये व मीटरचे रिडिंग प्रत्येक महिन्याला घ्यावे. या प्रकरणाची सुनावणी दि. १५.०५.२०१८ व १९.०६.२०१८ रोजी घेण्यात आली. त्यावेळी अर्जदाराने व त्यांचा मुलगा त्यांचा मुलगा श्री. दिनेश बब्रुवान पवार यांनी असे सांगीतले की, मे २०१४ या महिन्याचे बिल रु. ८६७४७/- एवढे होते व ते दुरुस्तकरुन रु. २०४४१/- एवढे देण्यात आले त्या बद्दलपण त्यांची तक्रार आहे. त्यांनी १९.०३.२०१८ रोजी रु. १०,०००/- भरलेले आहेत मीटर फास्ट चालतो व तक्रार केल्यानंतर कोणीही दखल घेतली नाही. तसेच सदर मीटर त्यांच्या नावे करुन द्यावा असे सांगितले.

महावितरण तर्फे श्री. एस. डी. कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, शाखा कार्यालय, उदगीर शहर २ व श्री. डी. पी. जाधव, सहाय्यक लेखापाल, उपविभाग उदगीर शहर उपस्थित होते. त्यांच्या तर्फे असे सांगण्यात आले की, ग्राहकाचा मीटर ऑक्टोंबर २०११ मध्ये बदलण्यात आला आहे. ऑक्टोंबर २०१३ मध्ये रिडिंग १६५१ एवढे असून नोव्हेंबर, डिसेंबर २०१३ व जानेवारी २०१४ या महिन्यांमध्ये ग्राहकास मीटर Change म्हणून दरमहा ३५ युनिटचे



Scanned by CamScanner

बील गेले आहे. तर फेब्रुवारी २०१४ मध्ये RNT म्हणुन ५४०० युनिट, मार्च २०१४ व एप्रिल २०१४ मध्ये In access म्हणून १५०० व ५० युनिटचे बिल गेले. या बिलाची वजावाट ग्राहकास बिलिंग सिस्टीम मधून मिळाली आहे. मे २०१४ मध्ये मीटर रिडिंग ४१७४ एवढे होते. त्यामुळे जादा आलेले बिल. ४१७४ - १६५१ = २५२३ युनीटचे बिल मागील सात महिन्या करिता बिलिंग सिस्टीम मधून दुरुस्त करुन देण्यात आले आहे. त्यापूर्वी ग्राहकाने ऑक्टोंबर २०१३ पर्यंत नियमीत बिल भरलेले आहे. या ग्राहकाचा मीटर HPL कंपनीचा असून, त्यांच्या बिलाची व्यवस्थीत दुरुस्ती झालेली आहे.

मंचासमोर सादर झालेली कागदपत्रे व सुनावणी मध्ये दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकून मंचास असे दिसून येते की, अर्जदारास ऑक्टोबर २०१३ पर्यंत या महिन्यापर्यंत रिडिंगप्रमाणे बिल गेलेले आहे. ग्राहकाचा सरासरी वापर ऑगष्ट ते जुलै हे वर्ष पकडून २००८-९, ९-१०, १०-११, ११-१२, १२-१३, १३-१४, १४-१५, १५-१६, १६-१७ व १७-८ मध्ये दरमहा १५६, १८९, १०४, ९७, ६३, २४७,१३१, १७५, ५४, १४१ असा आहे. २०१३-१४ या वर्षात मे महिन्यामध्ये २५२३ युनिटचे बिल गेलेले असून त्या वर्षाचा सरासरी वापर २४७ युनिट म्हणजे सर्वात जास्त दर्शवतो. यामुळे २५२३ युनिटचे बिल आणखीन विभागून देणे गरजेचे आहे. अर्जदार ही अनुसूचीत जमातीची अबला आहे, त्यांचे पती वारलेले आहेत, मुले शिकत आहेत व तिला उत्पनाचे साधन नाही हे तिच्या निवेदनावरुन दिसून आल्यामुळे, त्याला मे २०१४ या महिन्यामध्ये देण्यात आलेले २५२३ युनिटचे बिल आणखी विभागून देणे न्याय्य आहे, म्हणून ते विभागून द्यावे. त्यानुसार मंच  खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहेत.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची अ फॉर्म मधील तक्रार अंशतः मान्य  करण्यात येत आहे.

२) ग्राहकास २५२३ युनिटचे बिल ऑक्टोबर २०११ (मीटर बदलल्यापासून) ते मे २०१४ या काळाकरीता विभागून देण्यात यावे. त्यावर दंड व व्याज लावू नये.

३) ग्राहकास नावातील बदल तातडीने करून द्यावा.

४) ग्राहकाची मीटर रिडिंग दरमहा नियमीतपणे घेण्यात यावे.

५) अर्जदारास यापुढेही जानेवारी २०१८ व जुलै २०१८ मध्ये ४२७ (तत्पूर्वी ११ महिने ५० युनिटचे बिल गेलेले आहे.) व ५११ युनिटचे बिल गेलेले आहे. याची तपासणी करुन गरज पडल्यास ते सुध्दा विभागून देण्यात यावे.

६) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सदर करू शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुध्वनी क्र.०७१२-२०२२१९८
ठिकाण : - लातूर
दिनांक :- ०२.०८.२०१८

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | सदस्य | कार्यकारी अभियंता/सचिव |
| ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर | ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर |



Scanned by CamScanner